**Appendix 'B'.**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत शिरगाव, जिल्हा रत्नागिरी येथे ३ वर्षाचा मत्स्य व्यवसाय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
शासन निर्णय क्रमांक : कोकृवि २०१०/प्र.क्र. १०१ /७-अ
दिनांक :- ६ ऑगस्ट, २०१०.

<u>प्रस्तावना</u> - सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी शिरगाव, जि.रत्नागिरी येथे ३ वर्षाचा मत्स्य व्यवसाय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत घोषित केले. महाराष्ट्र हे देशातील फळे, भाजीपाला, दुध तसेच मत्स्य उत्पादन करणारे अग्रेसर राज्य आहे. परंतु या उत्पादनापैकी ३० ते ४० टक्के उत्पादन योग्य हाताळणी व प्रक्रिया अभावी वाया जाते. या पार्श्वभूमीवर तसेच मुख्यतः स्वयंरोजगार निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवून या अभ्यासक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे. देशाला निसर्गाकडून लाभलेल्या समुद्रीय परिस्थितीमुळे अनेक प्रकारच्या मासळीचे उत्पादन उपलब्ध होते. म्हणून उत्पादनानंतर मासळी व त्यापासून बनविलेल्या पदार्थांची गुणवत्ता कायम राखून या क्षेत्रातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हाने पेलणे तसेच तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करणे व मत्स्य निर्यातीस असलेला वाव लक्षात घेऊन या क्षेत्रातील तज्ञ निर्माण करणे व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून अर्थार्जनाबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे या सर्व गोष्टी साध्य करणे तसेच मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी अर्थसंकल्पिय भाषणात केलेल्या मुद्याची पूर्तता करण्याकरिता सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत शिरगाव, जि.रत्नागिरी येथे ३ वर्षाच्या मत्स्य व्यवसाय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करणे तसेच या संस्थेच्या इमारत बांधकाम व वेतन भत्त्यासाठी लागणाऱ्या रु.४२.८७ कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u>

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत शिरगाव, जि.रत्नागिरी येथे ३ वर्षाचा मत्स्य व्यवसाय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासन मान्यता व संस्थेच्या अंदाजीत रु.४२.८७ कोटी एवढ्या खर्चास प्रशासकीय / वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर अभ्यासक्रमाकरीता आवश्यक शिक्षक व शिक्षकेतर पदाबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. याकरीता लागणारा सर्व खर्च अर्थसंकल्पित करुन घ्यावा. तसेच दरम्यानच्या कालावधीत इमारत बांधकाम, निवासस्थाने व इतर सर्व बाबींकरीताचे कामकाज पूर्ण करुन घेण्यात यावे.

३. या अभ्यासक्रमाचा कार्यकाल ३ वर्ष असून तो ६ अर्ध सत्रामध्ये विभागलेला असेल याकरीता इयत्ता १० वी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेण्यास पात्र असतील.

४. या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता २० विद्यार्थी प्रती वर्ष असेल.

५. या अभ्यासक्रमाकरिता आवश्यक शुल्क महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांनी निश्चित केल्याप्रमाणे असेल.

६. या अभ्यासक्रमांतर्गत मासेमारी नौका बांधणी, नौका उपकरणे दुरुस्ती व देखभाल, मत्स्य शेतीसाठी तलाव बांधणी इ. मत्स्य अभियांत्रिकी विषयाशी निगडीत आवश्यक उपविषयांच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव असेल. हा अभ्यासक्रम अभ्यासित असताना विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार पुढील ४ पैकी एका विषयाचे सम्यक ज्ञान व प्रत्यक्ष क्षेत्रातील १ वर्षाचा अनुभव आत्मसात करुन पदविका अभ्यासक्रम पूर्ण करतील.

अ) मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी नौका बांधणी)

ब) मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मासेमारी तंत्रज्ञान)

क) मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य प्रक्रिया आणि शीतकीकरण यंत्रसामुग्री)

ड) मत्स्य अभियांत्रिकी पदविका (मत्स्य संवर्धन अभियांत्रिकी)

७. हा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी / विद्यार्थिनींना (B.F.Sc.) पदवि अभ्यासक्रमाच्या दुस वर्षाच्या थेट गुणवत्तेनुसार मर्यादेत संख्येच्या प्रमाणात प्रवेशाकरीता पात्र राहील.

८. या अभ्यासक्रमाकरीता लागणारी जमिन भात संशोधन केंद्र, शिरगाव यांचे नावे असलेली ५.६५ ए क्षेत्रफळाच्या जमिनीद्वारे उपलब्ध करुन घेता येईल. याप्रमाणे जमीन उपलब्धतेबाबतची कार्यवाही विद्यापीठाने करावी

९. या अभ्यासक्रमाच्या पायाभूत सुविधांची उभारणी जसे इमारत, कार्यशाळा, बर्फाचा कारखाना, शीतगृ बीजोत्पादन केंद्र, मासेमारी नौका व अवजारे इ.करीता लागणारी तरतूद विद्यापीठाने उपलब्ध करुन घ्यावी.

१०. या अभ्यासक्रमाच्या कालावधीत भारताच्या दक्षिण किनारपट्टीवरील १५ दिवसाच्या शैक्षणिक सह आयोजन तृतीय सत्राच्या परीक्षेनंतर सुट्टीच्या कालावधीत करण्यात येईल. या सहलीत विद्यार्थी मत्स्य अभियांत्रि संस्था, नौका बांधणी प्रकल्प, मत्स्य प्रक्रिया केंद्र, मासेमारी बंदरे इ. स्थळांना भेटी देतील.

११. हा अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता रु.१२.२२ कोटी इतका आवर्ती खर्च तसेच ३०.६५ कोटी अनावर्ती खर्च वर्षांकरीता अपेक्षित आहे. या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१२. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १८७/१४३१, दि. ४/८/२०१० व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र. १६२/१०-व्यय-१, दि. ६/८/२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जी. क. राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री
सर्व अपर मुख्यसचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
कुलगुरु/कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कुलगुरु /कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली (१० प्रती)
कुलगुरु/ कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलगुरु/कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (५ प्रती)
वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
जिल्हाधिकारी, रत्नागिरी
विभागीय कृषि अधिकारी, रत्नागिरी
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी
नियोजन विभाग/वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई
उपसचिव, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
कार्यासन ६-अे, ८-अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती - ९-अे